# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त एच/पूर्व यांचे कार्यालय,१३७ टी.पी.एस. ५, दुसरा रस्ता, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई- ४०० ०५५.

**क्र.स.आ.एच/पूर्व/ /एस.आर/स.अ.(परि.) दि.**

## स्वारस्य अभिव्यक्ती

एच/पूर्व विभाग प्रशासकीय इमारतीमध्ये स्थित "पहिल्या मजल्यावरील कार्यालयांत आवश्यक सुधारणा करणेकरिता व साहित्य पुरविण्याकरिता" महानगरपालिकेच्या अटी व शर्तीसापेक्ष म.न.पा. अधिकृत ठेकेदार यांच्याकडून बाजार भावानुसार दर मागवित आहोत.

म.न.पा. अधिकृत ठेकेदारांचे अर्ज जमा करण्याची मुदत ही दि.19.11.2025 रोजी संध्याकाळी 05.00 वाजे पर्यंत आहे. तदंनतर कोणतेही अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. सदर अर्ज हे सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग यांच्या कार्यालयात घेण्यात येणार असून, संबंधित ठेकेदाराने सीलबंद लिफाफ्याद्वारे दर जमा करावेत.

सदर अर्ज जमा करण्याकरिता म.न.पा अधिकृत ठेकेदारांनी अथवा त्यांच्या नियुक्त प्रतिनिधींनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. कोणत्याही म.न.पा. अधिकृत ठेकेदाराच्या एक पेक्षा जास्त प्रतिनिधींना सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग यांच्या कार्यालयात प्रवेश देण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

स्वारस्य अभिव्यक्ती स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व यांनी राखुन ठेवलेला आहे. कोणत्याही प्रकारची अट असलेली स्वारस्य अभिव्यक्ती स्विकारली जाणार नाही.

**सोबत-** उपरोक्त अंतर्गत आवश्यक बाबींची सूची व प्रमाण/संख्या यांचा तक्ता जोडला आहे. सदर रकान्यात आपले इच्छुक दर नमूद करून सीलबंद लिफाफ्याद्वारे या कार्यालयात जमा करावेत.

**सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व**